# बृहन्मुंबई महानगरपालिका

## निवडणूक विभाग

### माहितीचा अधिकार अधिनियम – 2005 नुसार

दिनांक 31.07.2022 पर्यंत अद्ययावत केलेली पुस्तिका

### (सन 2022-23 करिता)

करनिर्धारक व संकलक
बृहन्मुंबई महानगरपालिका
यांचेद्वारा प्रकाशित

# अनुक्रमणिका


| अनु क्र. | नियम-पुस्तिका | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | - | प्रस्तावना | 1 |
| 2 | (एक) | खाते त्याची कामे व कर्तव्ये याचा तपशील. | 2 ते 3 |
| 3 | (दोन) | खात्याच्या अधिका-यांचे व कर्मचा-यांचे अधिकार व कर्तव्ये. | 4 ते 8 |
| 4 | (तीन) | पर्यवेक्षण व जबाबदारी ठेवण्याच्या मार्गासह निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती. | 9 |
| 5 | (चार) | आपली कामे पार पाडण्यासाठी खात्याने निश्चित केलेली प्रमाणके. | 10 |
| 6 | (पाच) | आपली कामे पार पाडण्यासाठी खात्याने धारण केलेले किंवा त्याच्या नियंत्रणाधीन असलेले किंवा त्याच्या कर्मचा-यांकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, निदेश, नियम-पुस्तिका व अभिलेख. | 11 |
| 7 | (सहा) | खात्याने धारण केलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाधीन असलेल्या दस्ताऐवजांच्या प्रवर्गाचे विवरणपत्र. | 12 ते 13 |
| 8 | (सात) | आपली धोरणे तयार करण्याच्या किंवा त्यांची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात जनतेतील कोणत्याही व्यक्तीशी विचारविनिमय करण्यासाठी, किंवा त्यांना प्रतिनिधित्व करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील. | 14 |
| 9 | (आठ) | मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि त्यांचा भाग बनलेल्या किंवा त्यांना सल्ला देण्याच्या प्रयोजनार्थ असलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या इतर संस्थांचे, आणि अशी मंडळे, परिषदा, समित्या व इतर संस्थांच्या सवलती व शिफारशी जनतेला कळू शकतील किंवा कसे, किंवा अशा बैठकांची कार्यवृत्ते जनतेस मिळण्यायोग्य आहेत किंवा कसे, यासंबंधीची माहिती. | 15 |
| 10 | (नऊ) | खात्याच्या अधिका-यांची व कर्मचा-यांची निर्देशिका. | 16 |
| 11 | (दहा) | खात्याच्या विनियमांमध्ये तरतूद केलेल्या भरपाईच्या तरतुदींसह खात्याच्या प्रत्येक अधिका-यास व कर्मचा-यास मिळालेले मासिक पारिश्रमिकसहीत वेतन. | 17 |
| 12 | (अकरा) | सर्व आराखडयांच्या, प्रस्तावित खर्चाच्या व केलेल्या संवितरणांवरील अहवालांच्या तपशीलासह त्याच्या प्रत्येक एजन्सींना नियतवाटप केलेली अर्थसंकल्पीय तरतूद. | 18 |
| 13 | (बारा) | वाटप केलेल्या रकमा व अशा कार्यक्रमांच्या लाभार्थींच्या तपशीलासह अर्थसहाय्यित कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याची रीत. | 19 |
| 14 | (तेरा) | खात्याने दिलेल्या सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे मिळणा-यांचा तपशील. | 20 |
| 15 | (चौदा) | इलेक्ट्रॉनिक स्वरुपात निविष्ट केलेली त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या किंवा त्याने धारण केलेल्या माहितीबाबतचा तपशील. | 21 |
| 16 | (पंधरा) | जर सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असतील तर, ग्रंथालये किंवा वाचनालयांच्या वेळांसह, माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचा तपशील. | 22 |
| 17 | (सोळा) | सार्वजनिक माहिती अधिका-यांची नावे, पदनामे व इतर तपशील. | 23 |
| 18 | (सतरा) | अन्य माहिती. | 24 ते 27 |

## प्रकरण 1

## प्रस्तावना

निवडणूक शाखा करनिर्धारण व संकलन खात्याचा असा विभाग आहे जो बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेवकांच्या सार्वत्रिक निवडणूका / पोट-निवडणूका घेतो.

मागील सार्वत्रिक निवडणूक फेब्रुवारी 2017 मध्ये घेण्यात आली होती. महानगरपालिकेच्या सभागृहाची मुदत 7 मार्च 2022 रोजी समाप्त झाल्याने तसेच दिनांक 31 जुलै 2022 पर्यत महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली नसल्याने सदर दिनांकापर्यंत नियोजित सार्वत्रिक निवडणूक घेण्याच्याबाबतीत पार पडलेले विविध टप्पे तसेच दरम्यानच्या कालावधीत मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांजकडून प्राप्त आदेशानुसार सार्वत्रिक निवडणूक घेण्यासंदर्भात पार पडलेल्या कामाच्या अनुषंगाने माहिती सदर मॅन्युअल मध्ये देण्यात आली आहे.

सन 2021 चा महाराष्ट् अध्यादेश क्र. 13 अन्वये मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 5 मध्ये केलेल्या सुधारणेनुसार महापालिकेतील नगरसेवकांची एकूण सदस्यसंख्या 236 इतकी निश्चित करण्यात आली आहे, जे प्रत्येक प्रभागातून थेट निवडणूकीने निवडले जातील आणि 5 सदस्यांची मनपा सभागृहाने ठरवून दिलेल्या पध्दतीप्रमाणे नेमणूक करण्यात येईल.

व्याख्या :-

| | |
|---|---|
| अधिनियम | अधिनियम म्हणजे मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 |
| नागरिकांचा मागासवर्ग | म्हणजे, राज्य शासनाने इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती म्हणून वेळोवेळी घोषित केलेले असे वर्ग किंवा अशा वर्गाचे भाग अथवा त्यांमधली गट |
| उमेदवार | म्हणजे निवडणूक लढविणारे उमेदवार |
| पालिका सदस्य | म्हणजे, महानगरपालिकेचा सदस्य म्हणून रीतसर निवडून आलेली व्यक्ती आणि त्यामध्ये ज्याला,-<br>(एक) महानगरपालिकेच्या आणि महानगरपालिकेच्या समितीच्या कोणत्याही बैठकीमध्ये मत देण्याचा ; आणि<br>(दोन) महानगरपालिकेचा महापौर म्हणून किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सभापती म्हणून निवडून येण्याचा हक्क असणार नाही अशा नामनिर्देशित पालिका सदस्याचा समावेश होतो ; |
| निवडणूक | म्हणजे, या अधिनियमाखाली पालिका सदस्याची किंवा पालिका सदस्यांच्या जागा भरण्यासाठी घेण्यात आलेली निवडणूक; |
| अनुसूचित जाती | म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 341 अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जाती असल्याचे मानण्यात येत असलेल्या अशा जाती,वंश किंवा जनजाती (जमाती) किंवा अशा जाती,वंश किंवा जनजाती यांचे भाग किंवा त्यामधील गट; |
| अनुसूचित जनजाती | म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 342 अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जनजाती असल्याचे मानण्यात येत असलेल्या अशा जनजाती किंवा जनजाती समूह किंवा अशा जनजाती किंवा जनजाती समूह यांचे भाग किंवा त्यांतील गट; |
| लघुवाद न्यायालय | म्हणजे, मुंबई येथील लघुवाद न्यायालय |